# तक्रार निवारण समिती

## मार्गदर्शक नियमावली २०१८-२०१९

तक्रार निवारण समितीची कार्यवाही व्यवस्थित व नियोजित पद्धतीने व्हावी या हेतूने २० जुले २०१९ रोजी समितीतील सन्मानीय सदस्यांच्या उपस्थितीत मार्गदर्शक नियमावली संदर्भात चर्चा केली गेली. सर्वांच्या सहमतीने नियमावलीत किंचित स्वरुपात बदल (अधोरेखांकित) केला गेला आहे. नियमावली खालील स्वरुपात आहे.

१. तक्रार निवारण समितीचे कार्यक्षेत्र केवळ विद्यार्थ्यांद्वारा केल्या गेलेल्या तक्रारी एकूण घेणे व सोडविणे ईथपर्यंत राहील.

२. समिती केवळ अध्ययन, अध्यापन, स्वच्छता, सुविधा, शिस्त आणि व्यवस्था या संबधित तक्रारीवर विचार करेल.

३. व्यक्तिगत (Personal) स्तरावर केलेल्या तक्रारीवर समिती विचार करणार नाही.

४. विद्यार्थ्याची तक्रार 'तक्रार निवारण समिती', डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर , च्या नावाने असायला पाहिजे. तक्रार पत्रात तक्रारकर्त्याचे नाव, वर्ग, माध्यम व सही असणे गरजेचे आहे. विनानावाची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

५. समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी होईल. सुट्टी किंवा अन्य कोणत्याही कारणांस्तव सभेच्या दिवसात बदल केला जाऊ शकतो. त्याप्रकारची अधिसूचना विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

६. समितीचे कमीत कमी दोन सदस्य निश्चित तारखेला तक्रार निवारण पेटी उघडतील. यावेळी तक्रारकर्त्याची उपस्थिती असणे अनिवार्य मानली जाईल.

७. तक्रार निवारण समितीची 'खुली सभा' दोन वेळा (प्रत्येक सत्रात एका वेळी) घेतली जाईल. तारखेच्या संबंधात समिती निर्णय घेईल. या सभेच्या आयोजनात विद्यार्थी आपल्या समस्यांच्या संदर्भात समितीच्या सदस्यासोबत चर्चा करू शकतात. यावेळी तक्रारकर्त्याने आपल्या सोबत लिखित स्वरुपात तक्रार घेऊन येणे अनिवार्य आहे.

८. एकूण प्राप्त तक्रारीचा लेखाजोखा निवेदनाच्या स्वरूपात प्राचार्यांकडे पाठविण्यात येईल.

९. तक्रारीच्या संदर्भात योग्य कार्यवाही होत नाही, ही बाब लक्षात आल्यास त्याप्रकारची माहिती महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीकडे लेखी निवेदनाच्या स्वरुपात दिली जाईल.

**समितीचे सदस्य**

डॉ.एम.जे.अवस्थी

डॉ.पी.एम.बागडे

डॉ.आय.के.ओरके

डॉ.एन.एस.बागडे

डॉ.सी.एस.पाटील

डॉ.वी.एस.चव्हाण

डॉ.एस.बी.भोवते

प्रा.एम.बी.येरकेलवार

डॉ.एस.सी.चिमणकर

**समन्वयक**

**डॉ.विमल राठोड**